महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

http://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmission@dvet.gov.in

## व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना

**१. संबंधीत शासन निर्णय:**

१.१. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटीसी-२२१७/ प्र.क्र.९९/ व्यशि-३, दि.२९.०५.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१.२. अनुसुचित जाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. व्यप्रशु-२०१९/ प्र.क्र.१७३/ शिक्षण-१, दि.०१.०८.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१.३. अनुसुचित जमातीच्या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आविवि-२०१९/ प्र.क्र.७४/ का-१२, दि.२९.०७.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

१.४. दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्तीचा लाभ देण्यास कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, शासन निर्णय क्र. आयटिआय-२०१९/प्र.क्र.५७/व्यशि-३, दि.२०.०९.२०१९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

**२. पात्रता:**

२.१. शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेंतर्गत अभ्यासक्रमांसाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप योजनेंतर्गत (पीपीपी) प्रवेशासाठी उपलब्ध जागा व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी उपलब्ध जागांवर केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने (Centralized Online Admission Process) प्रवेश घेतलेले प्रशिक्षणार्थी पात्रतेचे इतर निकष पूर्ण करीत असल्यास पात्र आहेत.

२.२. खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये व्यवस्थापन कोट्यातील जागांवर (Management Seats) व संस्थास्तरावर भरण्यात येणाऱ्या जागांवर (Institute Level Seats) प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी सदर योजनेंतर्गत लाभास पात्र नाहीत.

२.३. प्रवेश घेतलेल्या तुकड्यांना राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) अथवा राज्य व्यवसाय प्रशिक्षण परिषद (SCVT) यांची संलग्नता (Affiliation) आवश्यक आहे.

२.४. प्रशिक्षणार्थ्याने यापूर्वी शासकीय अथवा खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये कोणत्याही अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला नसावा. म्हणजेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रथमच प्रवेश घेणारे प्रशिक्षणार्थी पात्र आहेत.

२.५. प्रशिक्षणार्थ्याने केंद्र अथवा राज्य शासनाच्या अथवा त्यांच्या अधिपत्याखालील स्थानिक प्राधिकरण/ कंपन्या/ महामंडळे यांनी पूरस्कृत केलेल्या कोणत्याही प्रशिक्षण कार्यक्रमांचा या पूर्वी लाभ् घेतलेला नसावा.

२.६. प्रशिक्षणार्थी हा महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र धारक असावा.

२.७. योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ २ अपत्यांपर्यत मर्यादित राहील.

**३. योजनेअंतर्गत दिले जाणारे लाभ:**

३.१. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा कमी असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

३.२. सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास आणि खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५० लाखापेक्षा जास्त व रु. ८ लाखापर्यत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या ८० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

३.३. इयत्ता १० वी अनुतीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापर्यत आहे व इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी ज्यांच्या कुटुंबांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. २.५१ लाख ते रु. ८ लाखापर्यंत असल्यास त्यांना खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना विहित केलेल्या प्रशिक्षण शुल्कामधून शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील अभ्यासक्रमांसाठी निश्चित केलेले प्रशिक्षण शुल्क वजा जाता उर्वरित प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

३.४. इयत्ता १० वी उत्तीर्ण प्रवेश पात्रता असलेल्या व्यवसाय अभ्यासक्रमांत प्रशिक्षण घेणारे अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप योजनेस पात्र आहेत.

३.५. दिव्यांग प्रवर्गातील प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण शुल्काच्या १०० टक्के इतक्या रक्कमेची व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | प्रशिक्षणार्थ्यांचा प्रवर्ग | कुटुंबाचे वार्षिक उपन्न मर्यादा | प्रवेश पात्रता व्यवसाय | व्यवसाय अभ्यासक्रम प्रकार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर मशीन गट - अभियांत्रिकी | बिगर अभियांत्रिकी |
| १ | शासकीय औ.प्र. संस्थांसाठी निर्धारित कमाल प्रशिक्षण शुल्क | | | १,२०० | १,००० | ८०० |
| २ | खाजगी औ.प्र. संस्थांसाठी निर्धारित कमाल प्रशिक्षण शुल्क | | | ३०,००० | २५,००० | २०,००० |
| **अनुज्ञेय प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती** | | | | | | |
| ३ | सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास | रु. २.५० लाखापेक्षा कमी | सर्व | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ४ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल | रु. २.५० लाखापेक्षा कमी | सर्व | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ५ | सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागास | रु. २.५० लाख ते रु. ८ लाख | सर्व | २३,०४० | १९,२०० | १५,३६० |
| ६ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल | रु. २.५० लाख ते रु. ८ लाख | सर्व | २३,०४० | १९,२०० | १५,३६० |
| ७ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. ८.०० लाखापेक्षा कमी | इ.१० वी अनुत्तीर्ण | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ८ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. २.५१ लाख ते रु. ८ लाख | इ.१० वी उत्तीर्ण | २८,८०० | २४,००० | १९,२०० |
| ९ | अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती | रु. २.५० लाखापेक्षा कमी | इ.१० वी उत्तीर्ण | केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक स्कॉलरशिप प्रमाणे | | |
| १० | दिव्यांग - शासकीय औ.प्र.संस्था | लागू नाही | सर्व | १,२०० | १,००० | ८०० |
| ११ | दिव्यांग - खाजगी औ.प्र.संस्था | लागू नाही | सर्व | ३०,००० | २५,००० | २०,००० |

४. **आवश्यक कागदपत्रे:**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती माहिती पुस्तिकेतील प्रपत्र - ३ “प्रवेशाकरिता आवश्यक कागदपत्रांची यादी” या मध्ये देण्यात आलेले व संबंधीत प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रवर्गानुसार आवश्यक सर्व कागदपत्रे व त्या व्यतिरिक्त खालील कागदपत्रे आवश्यक आहेत:

४.१. आधार नोंदणी कार्ड

४.२. प्रशिक्षणार्थ्यांचे नाव समाविष्ट असलेले रेशनकार्ड

४.३. महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

४.४. पालकांचा उत्पन्नाचा दाखला

४.५. जातीचा दाखला

४.६. जात वैधता प्रमाणपत्र

४.७. दिव्यांग प्रवर्गातिल प्रशिक्षणार्थ्याकरीता वैद्यकीय मंडळाकडून दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ज्यात अपंगत्व कायमस्वरुपी असून त्याचे प्रमाण ४०% पेक्षा जास्त आहे असा स्पष्ट उल्लेख आहे.